# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/09/2023 (मंगळवार) सकाळ

---

### अधिसूचना

**(मौजा नांदा कृत्रीम तलाव व किल्लेकोलार येथिल श्री. गणेश विसर्जन करिता जड वाहनांच्या रहदारीचे नियमनाबाबत)**

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत मौजा नांदा–कोराडी येथिल कृत्रीम तलावात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री गणेश मुर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणावर दिनांक २८/०९/२०२३ ते दि. ०१/१०/२०२३ रोजी पर्यंत होणार आहे. सन २०२१ पासुन नागपूर महानगर पालीका अंतर्गत येणाऱ्या फुटाळा, अंबाझरी, शुक्रवारी व कोराडी तलावात गणेशमुर्ती विसर्जन करण्यास प्रशासनाने मनाई केली आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर नागपूर शहर येथून गणेश विसर्जन मिरवणुक मौजा नांदा येथिल विसर्जन स्थळावर येतात, त्यामुळे अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच १६०० ते १७०० पेक्षा जास्त सार्वजनिक गणपती व १०,००० ते ११,००० खाजगी/घरगुती गणपतीचे विसर्जन होत असते. मौजा नांदा–कोराडी कृत्रीम तलाव हा नागपूर ते भोपाल राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ ला लागुन असुन नागपूर शहर व नागपूर ग्रामिण भागातील जवळपास असणारे गणपती मिरवणुक व घरगुती गणपती हे खाजगी २ चाकी, ४ चाकी वाहनाने विसर्जनाकरिता येतात. त्यामुळे वाहतूकीची कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. वरिल परिस्थिती टाळण्यासाठी दिनांक २८.०९.२०२३ चे सायंकाळी १७.०० वा. ते दिनांक २९.०९.२०२३ चे सकाळी ०३.०० वा. पर्यंत तसेच दिनांक ३०.०९.२०२३ चे सायंकाळी १७.०० ते ०१.१०.२०२३ चे सकाळी ०३.०० वा. पर्यंत सर्व प्रकारची जड वाहन व लोकल ट्रक वाहतुकीस राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ सावनेर ते नागपूर मार्गावरिल दहेगाव रंगारी ते मौजा नांदा पर्यंत नागपूर ग्रामिण हद्दीपर्यंत प्रवेश देणे सर्वसाधारण जनतेच्या जिवीतास धोकादायक आहे. याची दक्षता घेवुन नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम १(ब) तसेच गृह विभाग क्र. एम. व्हि.ए.–०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२, दिनांक १९.०५.१९९० अन्वये व ११५, ११६, ११७ मोटार वाहन कायदा (१९८८ चा नियम ५९) यानुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये त्यांच्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या नागपूर जिल्हा (ग्रामीण) अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ मौजा दहेगाव रंगारी ते नांदा नागपूर ग्रामिण हददीपर्यंत श्री. गणेश विसर्जन निमित्त दिनांक २८.०९.२०२३ चे सायंकाळी १७.०० वा. ते दि.२९.०९.२०२३ चे सकाळी ०३.०० वा. पर्यंत तसेच दि. ३०.०९.२०२३ चे सायंकाळी १७.०० वा. ते ०१.१०.२०२३ चे सकाळी ०३.०० वा. पर्यंत सर्व प्रकारच्या जड वाहन व लोकल ट्रक वाहतुकी करिता बंद करण्यात येईल. सदर अधिसूचना दि. २८/०९/२०२३ ते दिनांक ०१/१०/२०२३ रोजी पावेतो ( दि. २९.०९.२०२३ चे ०३.०० वा. ते दि. ३०.०९.२०२३ चे १७.०० वा. पर्यंतचा कालावधी वगळुन) अंमलात राहील याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर